# उदकशांत विधि पूर्व तयारी

- पूजेच्या दिवशी लवकर उठून स्नान करून नित्य देवपूजा करावी व उदकशांतीच्या तयारीस सुरूवात करावी. सर्व पूजा साहित्य गुरूजींनी दिलेल्या यादीनुसार पुन्हा एकदा तपासून बघावे.
- मुख्य दाराला तोरण बांधावे. दारासमोर रांगोळी काढावी. मंगल व पवित्र वातावरण तयार करण्यासाठी चांगले सतार, सनई, संतूर, बासरी वगैरे मंगल वाद्य संगीत सुरू करावे.
- कॅमेरा व कॅमकॉर्डर तयार ठेवा व हा तुमच्या आयुष्यातला महत्वाचा क्षण जपुन ठेवण्यास विसरू नका.
- **अतिशय महत्वाचे**: हवामाननुसार होम हवन बॅक यार्ड किंवा गॅरेजमध्येच करण्यांत येईल. आगीच्या वा आरोग्याला असलेल्या संभाव्य धोक्यामुळे कोणत्याही परीस्थितीत होम हवन घरामध्ये अथवा फायर प्लेसमध्ये करण्यात येणार नाही. कुठल्याही कारणास्तव जर आपणाला होम हवन घरातच किंवा फायर प्लेसमध्येच करायची इच्छा असेल तर मला क्षमा करावी, एव्हढा मोठा धोका पत्करून, मला आपणाकडे पौरोहित्यासाठी येणे जमणार नाही. मला खात्री आहे आपण मला समजून घ्याल. धन्यवाद.
- प्रसाद व महाप्रसाद वेळेत तयार करावा. शक्य असल्यास २ किंवा ३ नातेवाईक वा मित्र कुटुंबांना सुरूवातीपासून मदतीला बोलवावे.
- घरात लहान मुले असल्यास त्यांच्या वयाच्या काही मुलांना शक्य असल्यास जेव्हढे जमेल तेव्हढे आधीपासून बोलवावे म्हणजे मुलं कंटाळून पूजा सुरू असतांना व्यत्यय आणणार नाहीत. मुलांच्या इच्छेनुसार पूजेमध्ये सहभागी व्हावयास सांगावे. त्यांच्यावर अवाजवी जबरदस्ती करू नये. मुले रमतील अश्या गोष्टींमध्ये त्यांना पूजा संपेपर्यंत गुंतवून ठेवावे उदा. गोष्टीची पुस्तके, आवडीचे बैठे खेळ, टीव्हीवरील आवडीचे कार्यक्रम, आवडीचे कार्टून वा कॉमेडी चित्रपट इत्यादी...मुलांची निट काळजी न घेता त्यांनी पूजेच्या वेळांत अजिबात त्रास देउ नये ही अपेक्षा करणे चुकीचे आहे ☺.
- यजमान दांपत्याने पूजेला बसण्याआधी घराण्याच्या परंपरेनुसार पूजेला योग्य अशी वेशभूषा करावी. यजमानाने सोवळे त्यावर कुर्ता अथवा झब्बा, पायजमा आणि यजमान पत्निने साडी किंवा सलवार कमीज दुपट्टा इ. वेशभूषा करावी.
- खाली दिलेल्या पद्धतीनुसार व चित्रांनुसार पुजेची तयारी करावी.

## || चौरंगाची मांडणी ||

- शक्यतो पूजेची मांडणी स्वयंपाकघरा जवळ करू नये म्हणजे पूजा करतांना स्वयंपाकाचा वास, फोडणीचा वास इत्यादींचा उपद्रव होणार नाही तसेच स्वयंपाकघरातील मोठ्याने होणाऱ्या गप्पांचा पूजेत व्यत्यय होणार नाही. ☺
- चौरंगा वरील देवतांचे मुख पूर्व दिशेला (शक्य नसल्यास पश्चिमेलाही चालेल) येईल अश्या रितीने योग्य जागी भिंतीला टेकुन चौरंग ठेवावा व त्यावर एक चांगले वस्त्र अंथरावे.
- सर्व पूजा साहित्य पूजेच्या जागी आणून वेगवेगळ्या तबकांमध्ये किंवा ताटल्यांमध्ये चौरंगाच्या उजव्या बाजूला नीट मांडून ठेवावे. एका वाटीत कपभर दूध घ्यावे, त्यात २ ते ३ चमचे दहि, १ चमचा मध, १ ते २ चमचे तूप व १ चमचा साखर टाकून पंचामृत तयार करावे. पूजाविधिसाठी जितक्या व्यक्तिंना आमंत्रण दिले असेल त्याप्रमाणात सर्वांना पुरेल इतके पंचामृत तयार करावे.
- चौरंगाच्या चार कोपऱ्यात सुंदर ताजी फुले असलेल्या फुलदाण्या ठेवाव्यात.
- चौरंगाच्या मध्यभागी मुठभर तांदुळ पसरून त्यावर चांदीचा किंवा तांब्याचा कलश ठेवावा. कलशात अंदाजे अर्ध्यापेक्षा थोडे जास्त असे पाणी भरावे. कलशात १ सुपारी, १ क्वार्टरचे (२५ सेंट्सचे) नाणे, १ फुल व थोडया अक्षता टाकाव्यात.
- चांदीच्या किंवा तांब्याच्या कलशाच्या मुखावर ५ विड्याची पाने सारख्या अंतरावर, देठ कलशात व पानाचा शेंडा कलशाबाहेर अशा रितीने ठेवावीत व त्यावर ताम्हण ठेवावे. ताम्हण तांदूळाने काठोकाठ भरून मध्यभागी कुंकवाने स्वस्तिक काढावे. स्वस्तिकाच्या मध्यभागी एक सुपारी ठेवावी.
- चौरंगावर पुढच्या बाजुला डाव्या कोपऱ्यात घंटा व उजव्या बाजुला तांदुळावर शंख ठेवावा.
- चौरंगावर कलशांच्या मागे भिंतीला टेकुन अथवा टांगुन कुलदेवता अथवा अन्य इष्ट देवतांच्या तसबीरी ठेवाव्यात.
- चौरंगावर कलशांच्या पुढे मधोमध गणपतिची मूर्ति ठेवावी. गणपतिच्या उजव्या बाजूस असल्यास लक्ष्मीची वा देवीची मूर्ति किंवा नाणे ठेवावे.
- आपल्या घराण्याच्या प्रथेनुसार चौरंगावर कुलदेवता व इतर देवतांच्या मूर्ति ठेवाव्यात.

## || चौरंगाच्या सभोवतालची मांडणी ||

- चौरंगाच्या समोर आणि डाव्या व उजव्या बाजूला कार्पेट किंवा फ्लोअर खराब होऊ नये म्हणून अंदाजे २ फूट रूंदीची ॲल्युमिनियम फॉईल पसरवून ठेवावी.
- चौरंगाच्या उजव्या बाजुच्या पुढिल कोपऱ्यात ॲल्युमिनियम फॉईलवर एक तेलाची समई व तुपाचे निरांजन प्रज्वलित करावे. समई व निरांजन एखाद्या छोट्याश्या ताटलीत ठेवावे म्हणजे तेल अथवा तूप ओघळले तरी नुकसान होणार नाही. निरांजनाच्या शेजारी उदबत्ती लावावी.
- चौरंगाच्या पुढिल बाजूस ॲल्युमिनियम फॉईलवर ५ नारळ एका रांगेत मांडावेत. प्रत्येक नारळापुढे १ विड्याचे पान त्यावर १ डॉलरची नोट, १ क्वार्टरचे (२५ सेंट्सचे) नाणे त्यावर १ सुपारी, गूळखोबरे व पंचखाद्य (खारिक, काजू, बदाम, पिस्ते, बेदाणे इत्यादि ५ प्रकारचे सुक्या मेव्याचे पदार्थ) ठेवावेत.
- विड्याच्या पानांसमोर १ ताम्हण, १ पंचपात्र (पाणी पिण्याचे भांडे) त्यात १ पळी, १ कलश भरून पाणी ठेवावे.
- चौरंगाच्या डाव्याबाजूला सोयीस्कर अंतरावर पूजेचे वापरलेले ताम्हणातले पाणी काढून ठेवण्यासाठी १ मोठ्या आकाराचे भांडे ठेवावे. त्याच्याजवळच पाण्याने भरलेले पूजेच्या पाण्याचे भांडे अथवा मोठ्या आकाराची पाण्याने भरलेली बाटली ठेवावी.

- १ तबक किंवा ताट घेऊन त्यात कुंकु, अष्टगंध व चंदन यांच्या मिश्रणाचे पाणी टाकून गंध तयार करावे. गंधाच्या शेजारीच हळद व कुंकु करंड्यात किंवा नुसतेच ठेवावे. त्याच्या शेजारी गुलाल, बुक्का, शेंदूर, अत्तराची बाटली इ. ठेवावे.
- आरतीसाठी १ स्वतंत्र तबक, ताम्हण किंवा ताट ठेवावे. त्यात असल्यास आणखी १ तूपाचे निरांजन ठेवावे.
- चौरंगाच्या समोर यजमान व यजमान पत्नीसाठी बसण्यासाठी चांगले आसन ठेवावे. यजमानांच्या उजव्या बाजूला यजमान पत्नीने बसावे.
- चौरंगाच्या डाव्या बाजूला भींतीला टेकुन एक आसन गुरूजींसाठी ठेवावे. यजमान पूर्वेकडे तोंड करून बसल्यास गुरूजींचे तोंड पश्चिमेकडे असले पाहीजे व यजमान पश्चिमेकडे तोंड करून बसल्यास गुरूजींचे तोंड पूर्वेकडे असले पाहीजे.
- सामग्री यादीत दिल्याप्रमाणे पूजेचे सर्व साहित्य प्लॅस्टीकच्या पिशव्यांमधून काढून वेगवेगळ्या ४ ते ५ ताटल्यांत, ट्रेमध्ये किंवा डिस्पोझेबल प्लेट्समध्ये चौरंगाच्या उजव्या बाजूला निट मांडून ठेवावे. यादीप्रमाणे पुन्हा एकदा साहित्य निट तपासुन बघावे. (पूजेचे सामान हरवू नये व गुरूजी आल्यावर सामग्रीवरून आपआपसांत भांडू नये. ☺)

**होम हवनाची तयारी**

- हवामान अनुकुल असल्यास होम बॅक यार्डमध्ये करणे योग्य अन्यथा गॅरेजमध्ये होम करावा. गॅरेजमध्ये होम करणार असल्यास फायर अलार्म व स्मोक डिटेक्टर सुरू होणार नाही ह्याची खबरदारी घ्यावी. आदल्या दिवशीच होमाची जागा (बॅक यार्ड वा गॅरेज) साफ करून ठेवावी. होमासाठी कमीत कमी अंदाजे ६ फूट लांब व ६ फूट रूंद जागा लागते.
- आगीच्या आणि आरोग्याला असलेल्या संभाव्य धोक्यामुळे मी होम हवन घरात किंवा फायरप्लेस मध्ये करण्याचे मान्य करू शकणार नाही. फायरप्लेसमध्ये आणखी एका कारणासाठी होम करता येत नाही कारण अग्निला प्रदक्षिणा करावी लागते.
- होमासाठी लागणारे सर्व साहित्य यादीप्रमाणे होमाच्या जागेजवळ निट मांडून ठेवावे.

वरील सर्व तयारी गुरूजी येण्या आधीच करावी म्हणजे पूजा वेळेत सुरू होऊन वेळेत संपू शकेल व उपस्थितांना, यजमानांना व गुरूजींना वेळेत प्रसाद भोजन मिळू शकेल. ☺







panditji@panditjiusa.com (Cell: 925-858-4540)